# ज्योतिर्मय

साहित्याचे विद्यापीठ

Online Journal of Literature....

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक ९ वा ❑ बुधवार दि.०५ फेब्रुवारी २०२५ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

## मराठीची सक्ती हवीच !

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

**ज्योतिर्मय साहित्य**




मराठी भाषेची आबाळ थांबवण्यासाठी राज्य सरकार सतत प्रयत्न करीत आहे, त्यासाठी नवनवे प्रयोग आणि उपक्रम राबवले जात आहेत. त्यातच आता सरकारने शासकीय स्तरावर मराठी सक्तीचा आदेश निर्गमित केला आहे. मराठीच्या अनिवार्यतेबाबतचा शासन निर्णय नियोजन विभागाकडून सोमवारी जारी करण्यात आला. मराठीतून न बोलणारे अधिकारी, कर्मचाऱ्यांची तक्रार थेट संबंधित विभागप्रमुख, कार्यालयप्रमुखाकडे करता येणार आहे. राज्यात मराठी भाषा धोरण लागू झाल्यानंतर आता सरकारी कार्यालयांत मराठी अनिवार्य करण्यात आली आहे. यानुसार आता सरकारी, निमसरकारी, स्थानिक स्वराज्य संस्था, महामंडळे तसेच सरकारचे अनुदान घेणाऱ्या कार्यालयातील कर्मचाऱ्यांना व तिथे येणाऱ्यांना मराठीतच बोलावे लागणार आहे. 'मराठीत बोला' अशा आशयाचे फलक या कार्यालयांत अनिवार्य करण्यात आले असून याची अंमलबजावणी न झाल्यास संबंधित अधिकारी, कर्मचाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई करण्यात येणार आहे.

मराठीच्या अनिवार्यतेबाबतचा शासन निर्णय नियोजन विभागाकडून सोमवारी जारी करण्यात आला. मराठीतून न बोलणार अधिकारी, कर्मचाऱ्यांची तक्रार थेट संबंधित विभागप्रमुख, कार्यालय प्रमुखाकडे करता येणार आहे. त्याची पडताळणी करून संबंधित सरकारी अधिकारी, कर्मचारी दोषी आढळल्यास त्याच्याविरोधात शिस्तभंगाची कारवाई करण्यात येणार आहे. ही कारवाईही तक्रारदाराला समाधानकारक न वाटल्यास मराठी भाषा समितीकडे या विरोधात अपील करता येणार आहे. हा निर्णय स्तुत्य असला तरी या निर्णयाची अंमलबजावणी होते का, हा खरा प्रश्न आहे. या आधी देखील शासकीय कार्यालयातील पत्रव्यवहारही भाषा मराठी असावी असा आदेश काढण्यात आला. मात्र त्याची काटेकोर अंमलबजावणी झाली का? सरकारने याबाबतीत आढावा तरी घेतला का? नियम करणे सोपे आहे. मात्र त्या नियमांची अंमलबजावणी करणे, राबवून घेणे, त्याचा पडताळा घेणे कठीण आहे.

शालेय शिक्षणात पाचवी ते दहावीपर्यंत मराठी भाषा विषय सक्तीचा करण्याचा निर्णय राज्य सरकारने नुकताच घेतला आहे.

राज्यातील इंग्रजी हिंदीसह, सर्व माध्यमांच्या सरकारी आणि खासगी शाळांना हा निर्बंध लागू असेल. मराठीला बळ देण्याच्या व मराठीचे महत्त्व टिकवून ठेवण्याच्या प्रयत्नांचाच हा भाग म्हणावा लागेल. शालेय शिक्षण विभागाने आधीच्या शासन निर्णयात 'मराठी विषय सक्तीचा' अशी सुधारणा केली आहे. आधीच्या निर्णयात तसा स्पष्ट उल्लेख नव्हता. त्याचा गैरफायदा घेऊन अनेक शाळांनी मराठी भाषेला दुय्यम स्थानावर ढकलले होते. ही चलाखी राज्य सरकारच्या नजरेतून सुटली नाही.

मराठीचे वावडे असणार्या इंग्रजी आणि इतर भाषिक शाळांना सुधारित निर्णयामुळे मराठी भाषेची उपेक्षा करता येणार नाही. नियमाचे उल्लंघन करणार्या शाळा व्यवस्थापनावर एक लाख रुपयांची दंडात्मक कारवाई करण्याची तरतूदही या निर्णयात आहे. सर्व भाषिक शाळांना मराठी विषय सक्तीचा केला ही चांगली गोष्ट आहे, पण अशी सक्ती करून इतर भाषिकांना मराठीची किती गोडी वाटेल याचाही विचार झाला पाहिजे. दहावी शालांत परीक्षेत मराठी विषयात काठावर पास होणारे वा नापास होणारे विद्यार्थीसुद्धा आढळतात.

तेव्हा मराठीतून शिकणार्या आणि मायबोली मराठी असणाऱ्या विद्यार्थ्यांच्या मराठी भाषेची अवस्था नेमकी काय आहे याचेही अवलोकन जरूर केले पाहिजे. तसेच विद्यार्थ्यांना मराठी शिक्षण्याचे आकर्षण कसे वाढेल याचा विचार भाषाविषयक तज्ञांनी गांभीर्याने करावा. मराठी भाषेच्या शिक्षणपद्धतीत जरूर त्या सुधारणा करण्याची गरज नजरेआड होऊ नये. सर्व भाषिक विद्यार्थ्यांत मराठी भाषा रुजवण्यासाठी राज्याच्या शालेय शिक्षण विभागाने उचललेले पाऊल प्रशंसनीय आहे. हा निर्णय कसोशीने अमलात आणला गेला तरच त्याला काही अर्थ राहील. सध्या शिक्षण संस्थांवर चालक म्हणून अनेक नेत्यांचा दबाव आणि प्रभाव काम करतो. किंबहुना असे नेते शिक्षणाचे घाऊक ठेकेदार होऊ पाहत आहेत.

आत्मनिर्भरतेचा काळ त्या प्रभावाला पुष्टी देणारा ठरला तर मात्र भाषेच्या सक्तीचा निर्णय कितपत प्रामाणिकपणे अमलात आणला जाईल हीही शंका मराठीप्रेमींच्या मनात घोंगावल्याशिवाय राहील का? केवळ इंग्लंड, अमेरिकेकडे मुलांना पाठवण्याचा इरादा बाळगणारे लाखो पालकदेखील कदाचित या निर्णयाबद्दल असहमती व्यक्त करतील. त्याबाबत सरकार किती दक्ष राहते यावर दहावीपर्यंत मराठी विषय सक्तीचा करण्याच्या निर्णयाची अंमलबजावणी अवलंबून राहील.

महाराष्ट्रात राहणार्याला मराठी बोलता आले पाहिजे, असा आग्रह परभाषिकांकडे धरला जातो, पण ज्यांची मायबोली मराठी आहे त्या उच्चभ्रूवर्गातील मंडळींच्या प्रभावाला आवर घालण्याचे धैर्य सरकार दाखवू शकेल का? जागतिक स्पर्धेत उतरण्यासाठी व तेथे टिकून राहण्यासाठी मराठी माणसांना जगाची भाषा असलेली इंग्रजी यायला हवीच, पण घरीदारी वावरताना अथवा कौटुंबिक संवादातही इंग्रजी बोलण्याचा अट्टाहास किती समर्थनीय? मराठीला महाराष्ट्रात राजभाषेचा दर्जा देण्यात आल्याचे सरकारकडून अभिमानाने सांगितले जाते, पण सरकारी कारभारातील अनाकलनीय मराठी भाषा आणि लोकांच्या दैनंदिन वापरातील मराठी यातील अंतर कमी करण्याचे फारसे प्रयत्न शासनाकडून झाल्याचे जनतेला सहसा आढळत नाही. साहजिकच या नव्या निर्णयाची प्रभावी अंमलबजावणी होईल का? हा प्रश्नही शासनाला विचारात घ्यावा लागेल. त्या शंकेचे निरसन निर्णयाच्या प्रभावी अंमलबजावणीने झाले तरच या निर्णयातून अनुकूल फलनिष्पत्ती होऊ शकेल. वर्षातून एकदा 'मराठी भाषा गौरवदिन' साजरा केला की मराठीविषयीची आपली जबाबदारी संपली, असे मानले जाते. या कल्पनेतून शासकीय यंत्रणेची सुटका करण्याची जबाबदारी सरकारला पेलणार का?

# एमआयटीच्या सभागृहात रंगणार शिक्षकांचे साहित्य संमेलन

## जिल्हाधिकारी स्वामी यांच्या हस्ते उद्घाटन; वाचन संस्कृती होणार मंथन

**ज्योतिर्मय साहित्य**

छत्रपती संभाजीनगर, ता.३ : जिल्हा परीषद शिक्षण विभाग आयोजित दुसरे शिक्षक साहित्य संमेलन बुधवारी (ता.पाच) एमआयटीच्या मंथन सभागृहात पार पडणार आहे. या संमेलनाचे उद्घाटन जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांच्याहस्ते होईल. संमेलनाच्या अध्यक्षपदी कवयित्री तथा लेखिका आशा डांगे; तर प्रमुख अतिथी म्हणून आमदार विक्रम काळे असतील. मुख्यकार्यकारी अधिकारी विकास मीना प्रमुख मार्गदर्शक म्हणून असतील, अशी माहिती शिक्षणाधिकारी अश्विनी लाठकर यांनी सोमवारी (ता.तीन) आयोजित पत्रकार परीषदेत दिली.

शिक्षकांच्या कलागुणांना वाव मिळावा, शिक्षकांमधील साहित्याची व वाचनाची आवड कायम राहावी, यातून विद्यार्थी गुणवत्ता वाढावी, या हेतूने शिक्षण विभागामार्फत दुसरे शिक्षक साहित्य संमेलन बुधवारी सकाळी आठ ते सायंकाळी सहा वाजेपर्यंत बीडबायबास वरील एमआयटी अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या मंथन सभागृहात होणार आहे. संमेलनात सकाळच्या सत्रात ग्रंथदिंडी, चित्रकला प्रदर्शन, संपादित लेखसंग्रहाचे प्रकाशन होईल. ११.३० ते १२.३० दरम्यान 'विद्यार्थ्यांमध्ये वाचन संस्कृती रुजविण्याचे आव्हान, साहित्य वाचनाची आवड कशी वाढवावी?' या विषयावर परिसंवाद होईल. त्यानंतर निमंत्रितांचे कविसंमेलन पार पडेल.

दुपारच्या सत्रात दोन वाजता कथाकथन, साडेतीन वाजता कविकट्टाचे दोन सत्र पार पडतील. सायंकाळी पाच वाजता समारोपाचा कार्यक्रम पार पडेल. या संमेलनासाठी प्रमुख पाहूणे म्हणून विभागीय शिक्षण उपसंचालक प्रकाश मुकुंद, माजी शिक्षणाधिकारी एम. के.देशमुख, एमआयटीचे मुनिष शर्मा, डॉ. हबीब भंडारे उपस्थित असतील, अशी माहिती लाठकर यांनी दिली. यावेळी उपशिक्षणाधिकारी गीता तांदळे, नीता श्रीश्रीमाळ, दिलीप शिरसाट, सुनिता वाघ, डॉ. जीजा शिंदे, उपशिक्षणाधिकारी गीता तांदळे, श्री श्रीमाळ, डॉक्टर विशाल तायडे, शिक्षण विस्तार अधिकारी दिलीप सीरसाट, संमेलनाच्या अध्यक्ष श्रीमती आशा डांगे, अधीक्षक ज्ञानदेव पानसरे, संगीता साळुंखे/गायकवाड, बी.जी, गायकवाड, गिरीश जोशी, गजेंद्र आवारे, सुनील डोके, सविता करंजकर, रायभान जाधव. आदींची उपस्थिती होती.

### 'माझ्या मनातील शिक्षक' लेखसंग्रह प्रकाशित

यंदा संमेलनात 'माझ्या मनातील शिक्षक' या विषयावर शिक्षकांकडून ललित लेख मागवण्यात आले होते. त्यानुसार शिक्षण विभागाला १०८ लेख प्राप्त झाले होते. यापैकी जवळपास १०२ लेखनाचा लेखसंग्रह मान्यवरांच्याहस्ते प्रकाशित केला जाणार असल्याचे लाठकर यांनी सांगीतले.

# है अंधेरी रात फिर भी रोशनी की बात कर लावण्या तू दीप येथे काळजाची वात कर

## सांजवातीला गझलसंध्येने आणली रंगत; चौथे जनसंवाद ग्रामीण साहित्य संमेलन

**ज्योतिर्मय साहित्य**

**नांदेड** – येथील सप्तरंगी साहित्य मंडळ आणि प्रज्ञादर्शन शिक्षण संस्था मुदखेड यांच्या संयुक्त विद्यमाने मुदखेड येथे चौथे जनसंवाद ग्रामीण साहित्य संमेलन नुकतेच संपन्न झाले. या संमेलनाच्या गझलसंध्या या सत्रात महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध गझलकारांनी गझलांची सांजवात लावून रंगत आणली. गझलसंध्या सत्रात पालम येथील सुप्रसिद्ध गझलकार आत्तम गेंदे अध्यक्षस्थानी होते. नांदेड व परिसरातील उदयोन्मुख गझलकारांनी आपल्या बहारदार शेर व गझलांनी रसिकांना खिळवून ठेवले व अवघे जनसंवाद साहित्य संमेलन गझलमय झाले. यावेळी स्वागताध्यक्ष प्रविणदादा गायकवाड, निमंत्रक प्रल्हाद हिंगोले, सप्तरंगी साहित्य मंडळाचे संस्थापक अध्यक्ष अनुरत्न वाघमारे राज्याध्यक्ष नागोराव डोंगरे उपाध्यक्ष पांडुरंग कोकुलवार, कार्याध्यक्ष प्रज्ञाधर ढवळे, राज्य सचिव कैलास धुतराज, कोषाध्यक्ष शंकर गच्चे, जिल्हाध्यक्ष रणजित गोणारकर महिला विभाग प्रमुख रुपाली वागरे वैद्य आदींची उपस्थिती होती.



है अंधेरी रात फिर भी रोशनी की बात कर, लावण्या तू दीप येथे काळजाची वात कर गझलसंध्या सत्राचे सूत्रसंचालक गझलकार चंद्रकांत कदम (सन्मित्र) यांनी शायर दीपक आंगेवारच्या वरील शेराने सुरेल सुरुवात केली. ती जुनी डायरी अन् तुझी आठवण, होत जाते गझल रात्रभर रात्रभर..व्यथेला फक्त औषध लागते स्वाती असे नाही,मनाचे दुःख ओसरले तरी रोगी बरा होतो अशा हटके शेरांनी नांदेडच्या गझलकारा डॉ.स्वाती भद्रे यांनी गझलसंध्येचा आगाज केला व रसिकांची दाद मिळवली. मागासलेपणाचा शिक्का जरी कपाळी, माणूसकीत पहिला नंबर मराठवाडा...देऊ नकोस खांदा माझ्या कलेवराला, पुन्हा कुडीत माझ्या येईल प्राण मित्रा अशा मार्मिक शेरांनी मातोश्री भागाबाई डोंगरे प्रतिष्ठानचा गझलरत्न पुरस्कार प्राप्त नांदेड येथील गझलकार जयराम धोंगडे यांनी उपस्थितांना अंतर्मुख केले. मला उचलून घेण्याला पुढे सरसावली आहे, भिमाच्या संविधानाची मिळाली सावली आहे...ते टोकदार नंतर होतात एवढे की, प्रस्तावही फुलांचा फेटाळतात काटे अशा विद्रोही व दमदार शेरांनी हिमायतनगर येथील धडाडीचे पत्रकार तथा गझलकार विजय वाठोरे यांनी रसिकांची दाद मिळवली.

वादळी वाऱ्यात..सगळे ठीक आहे ना? आपल्या दोघात..सगळे ठीक आहे ना? सावली साधी जरी आहेस तू पोरगी आहेस..सांभाळून जा अशा सध्याच्या अस्वस्थ वर्तमानाचा ठाव घेणाऱ्या देगलूर येथील गझलकारा दीपाली कुलकर्णी यांच्या शेरांनी रसिकांना विचार करायला भाग पाडले. संसदेचा या तमाशा पाहवेना,ती अचानक पेटली तर काय जाते? मृत्यू असा मिळावा पाषाण गहिवरावे, यमही कबूल व्हावा उचलून चूक केली! अशा सटीक शेरांनी हिमायतनगर येथील उदयोन्मुख गझलकार विजय धोबे यांनी रसिकांना निःशब्द केले. गझलकार लेखक कवी बिवी काहीच नको, म्हणा लेकरू मला भिमाचे विषय संपला...ललकारण्याआधी मला लक्षात ठेवा, आंबेडकर माझ्यामधे लोडेड आहे...जुलमी उभी व्यवस्था नाकारतो म्हणूनच, जयभीम शोषितांचा आवाज होत आहे अशा धगधगत्या विद्रोही शेर व गझलांनी सूत्रसंचालक चंद्रकांत कदम (सन्मित्र) यांनी रसिकांची दाद मिळवली व बहारदार सूत्रसंचालनाने रसिकांना खिळवून ठेवले.

## लक्षवेधी छायाचित्र....



काय तो रुबाब... काय ती मातृभक्ती....
(स्थळ –आफ्रिकेतील जंगल )

(छाया : संजय दारमावार, मुंबई)






– विद्यावाचस्पती विद्यानंद
Mobile: +917709612655
Email: vidyavachaspati.vidyanand@gmail.com



आनंदी पहाट...

## अंतरात्म्याच्या शोधामुळे आत्मबोध होतो सौंदर्यपूर्ण सकारात्मक विचार

ज्योतिर्मय साहित्य

मिळेल त्यांत समाधानी राहावं असं म्हंटलं जातं, पटतं का आपल्याला? खरंच जे काही मिळतं त्यांत आपण खरंच समाधानी राहू शकतो का? समाधानाचा संबंध थेट आपल्या अंतर्मनाशी असतो. त्यामुळे आपल्या अंतर्मनाला जोपर्यंत समाधान मिळत नाही, तो पर्यंत आपण मानसिक पातळीवर स्वास्थ्य मिळवू शकत नसतो. आपण करत असलेल्या सर्वच गोष्टी आपल्याला नेहमीच समाधान मिळवून देतातच असं नाही. आपण करत असलेल्या गोष्टींमध्येच आपण समाधान शोधत असतो. परंतू ज्या गोष्टी आपल्याला समाधान देतील त्यांची आपण निवड करतो का? अंतरात्म्याला शांती मिळणं अत्यंत जरुरीचं असतं.

आपल्या दैनंदिन गरजा भागवताना आपण केवळ शरीराचाच विचार करत असतो. अन्न, वस्त्र, निवारा ह्या तीनही गरजा खरं तर आपल्या शरीरासाठी आवश्यक असतात. आपल्याला त्याव्यतिरिक्त आणखीन एका गोष्टीची गरज असते, ती म्हणजे शांतीची. आपल्या अंतर्मनाला, अंतरात्म्याला शांती मिळणं मानसिक स्वास्थ्यासाठी अत्यंत आवश्यक असते. आपल्या दैनंदिन गरजांची पूर्तता करण्याच्या धावपळीत आपण आपली मुलभूत गरजच विसरून जातो, त्याची जाणीवच आपल्याला होत नाही. आपल्या जीवनांतील सार कशांत आहे? हे आपण स्वतःच शोधून काढायचं असतं. त्याच्यासाठी आपल्या अंतरात्म्याचा शोध घेण्याची, त्याला समजून घेण्याची, त्याचा यथायोग्य विचार करण्याची जरुरी असल्याची आपल्याला जाणीव असलीच पाहिजे. आनंदाची गोडी अवीट असते, त्यामुळे आनंदप्राप्तीचा कधीच वीट येत नाही. आनंदाची प्राप्ती करण्यासाठी सकारात्मक विचार, वर्तन, व्यवहाराची गरज असते. त्यायोगेच सकारात्मक वातावरणाची निर्मिती होऊ शकते. आनंदाची निर्मिती आपल्याच अंतरंगांत करावी लागत असते.


## श्रीपाद वल्लभ दिगंबरा...

ज्योतिर्मय साहित्य


दत्तगुरूंच्या आरत्या असोत की श्रीपाद वल्लभ दिगंबरा ... हा मंत्र, त्यात इतकी गोडी आहे की आपण ते म्हणताना भान हरवतो. महाराष्ट्रात आणि भारतातही दत्तगुरूंची अनेक ठिकाणी सुंदर मंदिरे आहेत. दत्तगुरूंची मूर्ती तर इतकी सुंदर असते की तिचं दर्शन घेताच मन शांत अन प्रसन्न होतं.

तीन शिरे कर सहा शोभती, हास्य मधुर शुभ वदनावरती ।
जटाजूट शिरी पायी खडावा, भस्म विलेपित कांती साजे ।
दत्त दिगंबर दैवत माझे, हृदयी माझ्या नित्य विराजे... ।।

अशा या दत्तगुरुंचा महिमा अपरंपार आहे. भक्ताच्या हाकेला धावून जाणारे हे दैवत आहे. ब्रह्मा, विष्णू आणि महेशाचा साक्षात अवतार म्हणजे दत्तगुरु ! ज्ञानियांचे दैवत म्हणजे ही गुरुमाऊली. अशा या दत्तगुरूंचे तीन अवतार होऊन गेले. प्रथम अवतार म्हणजे श्रीपाद श्रीवल्लभ. द्वितीय अवतार म्हणजे श्री नृसिंह सरस्वती आणि तृतीय अवतार म्हणजे श्री स्वामी समर्थ. यापैकी नरसिंह सरस्वती आणि श्री स्वामी समर्थ यांची बऱ्यापैकी माहिती सर्व भाविकांना असते. पण दत्तात्रेयांचा प्रथम अवतार असलेल्या श्रीपाद वल्लभ यांची फार थोडी माहिती आपल्याला असते. त्यांच्याबद्दलच जाणून घेण्याचा प्रयत्न करू या.




गंगाधर सरस्वती यांनी गुरुचरित्र हा अत्यंत प्रासादिक आणि दत्तभक्तांच्या कामना पूर्ण करणारा ग्रंथ लिहिला. या गुरुचरित्राचे नायक आहेत श्री नृसिंह सरस्वती. त्यामुळे गुरुचरित्रात श्रीपाद श्रीवल्लभ यांची फार कमी माहिती मिळते. अध्याय ५, अध्याय ८,९, आणि १० यात श्रीपाद श्रीवल्लभ यांच्या चरित्रातील ठळक घटना आपल्याला वाचायला




मिळतात. तर अध्याय ४९ मध्ये त्यांच्या अवतार कार्याचे महत्व सांगणाऱ्या काही ओव्या आहेत. पृथ्वीवर खरा धर्म म्हणजे काय हे लोक विसरले होते. खरा धर्म म्हणजे काय ते न कळल्याने लोक दुराचारी होऊ लागले होते. भोळ्या भाविकांना धर्माच्या नावाखाली फसवले जात होते. त्यांना गुरुशिष्य परंपरेच्या द्वारे धर्माचे मर्म कळावे, लोकांना सन्मार्गाला लावावे या हेतूने दत्तगुरूंनी श्रीपाद श्रीवल्लभांच्या रूपाने अवतार घेतला. त्यांचेच अवतारकार्य कथारूपाने आपण समजून घेऊ या.

आंध्र प्रदेशातील पिठापूर नावाचं एक छोटंसं गाव. या गावात सुमती आणि आपलराजा या नावाचं एक ब्राह्मण जोडपं राहत होतं. त्यांची परिस्थिती बेताचीच होती. पण पतिपत्नी दोघेही अत्यंत धार्मिक आणि परोपकारी होते. आलेल्या अतिथीला ते कधीही विन्मुख पाठवत नसत. अशा या धर्मपरायण दाम्पत्याला एक दुःख होते. त्यांना उत्तम संतती नव्हती. सुमतीला सुरुवातीला झालेली काही बाळे अल्पजीवी ठरली. त्यानंतर त्या माउलीला दोन मुले झाली. पण त्यातील एक अंध आणि दुसरा पांगळा होता. परंतु परिस्थितीशी संघर्ष करीत त्यांनी आपली परमेश्वराची नित्य आराधना सुरूच ठेवली होती. एके दिवशी त्यांच्या घरी पितरांचे श्राद्ध होते. सुमतीने सर्व स्वयंपाक केला आणि देवापुढे ती नैवेद्याची थाळी ठेवणार तोच तिला आवाज आला, ओम भवती.. आपल्या हातातील थाळी तशीच घेऊन ती दारापाशी आली. दारी एक तेज:पुंज अतिथी उभा होता. त्या अतिथीला पाहून ती भारावली. तिने त्याचे स्वागत केले. आपल्या हातातील थाळी त्याच्यापुढे ठेवली. त्याच्या चरणाशी नतमस्तक झाली. नंतर तिने जेव्हा मान वर करून पाहिलं तेव्हा प्रत्यक्ष दत्तगुरूंचे दर्शन तिला घडले. त्यांची सुमधुर वाणी तिच्या कानावर पडली. माते, तुझ्या भक्तीने मी प्रसन्न झालो आहे. तुला काय हवे ते माग. **(क्रमशः)**



दासबोध स्तवन



उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

## परमार्थ स्तवन

ज्योतिर्मय साहित्य

**(मागील अंकावरून)**

पसारा केवळ कल्पनामय आहे असे वाटते आणि तेव्हाच विवेकाच्या सहाय्याने शुध्द आत्मस्वरूपाचे अंतर्यामी दर्शन घडते . आतबाहेर ब्रम्हदर्शन होण्याची अवस्था अंतर्यामी स्थिर झाली की सर्व संशय नाहीसे होतात. सात्विक सामान्य माणसाने संतसंगती धरली तर जीवनात विसावा मिळून समाधान लाभते.

अनेक जन्माचे पुण्य पदरी असेल तरच परमार्थ घडतो. अशा परमार्थाचे कार्य पुढील प्रमाणे आहे.


परमार्थच संसारातून निटपणे पार पडला जातो. म्हणजे संसारी व्यक्ती ला परमार्थ खुप महत्वाचा आहे. मनुष्य जन्माचे सार्थक परमार्थातुनच होते. आणि सुखाचा मार्ग दाखवतो. तापसांना आधार देतो. आश्रय देतो. भवसागरातुन बाहेर पडण्यासाठी मार्ग दाखवतो. ज्याला परमार्थ साधता आला तोच खरा राजा होय. परमार्थ करत नाही त्याला भिकारी समजावे. अनेक जन्माचे पुण्य पदरी असेल तरच हातुन परमार्थ घडतो.

समर्थ सांगतात मनुष्य जन्माचे सार्थक करून घ्यायचे असेल तर परमार्थाच्या नादी लागावे. भगवत् भक्ती करून परमात्व स्वरूपाचा आनंद घ्यावा. आनंदाचे डोही आनंद तरंग.अशी अनुभुती घेऊन मानवी जन्म सार्थकी करावा व आपल्या कुळाचा ऊध्दार करावा.

श्री राम जय राम जय जय राम
जय जय रघूवीर समर्थ

परमार्थ स्तवनाचा अभ्यास करत असताना माझ्या लिखाणात काही अधिक ऊणे झाल्यास समर्थ मला माफ करतील.

जय जय रघुवीर समर्थ।।



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

## नामात असणे म्हणजे शुद्धीवर असणे.

ज्योतिर्मय साहित्य

नामात असणे म्हणजे शुद्धीवर असणे.

दारूड्यांच्या मेळाव्यात सारेच धुंदीत असतात. पण त्यांतला एखादा दारू न प्यालेला असला तर बाकीचे दारूडे त्याला हा शुध्दीवर नाही असे म्हणत असतात. वास्तविक तोच एकटा शुध्दीवर असून बाकीचेच खरे गैरसावध असतात. त्याप्रमाणे आपण सर्वजण विषयात दंग असल्याकारणाने, जो नामात असतो त्याला आपण हा शुध्दीवर नाही असे म्हणत असतो. वास्तविक पाहता, नामाशिवाय जगात दुसरे सत्य नाही अशी ज्याची दृढ भावना असते तोच खरा शुद्धीवर असतो, व आपण मात्र भ्रमात असतो. आपल्याला झालेला हा भ्रम नाहीसा करायला तीन उपाय आहेत. एक सद्विचार, दुसरा सत्संगती, आणि तिसरा नामस्मरण. भगवंताचा विचार हाच खरा सद्विचार. एखाद्या माणसाला म्हटले की तुझे अवयव आणि रंग यांच्याशिवाय ये, तर त्याला येता येणार नाही; कारण तो जिथे आहे तिथे त्याचा रंग आणि अवयव हे असणारच. त्याचप्रमाणे नाम, संत, आणि भगवंत हे एकमेकांना चिकटूनच आहेत, त्यामुळे जिथे नाम आहे तिथे सत्संगती आणि भगवंत असतातच. वासरू घेऊन गेले म्हणजे जशी गाय पाठीमागून आपोआप येते, त्याप्रमाणे नाम घेतले की भगवंत त्यामागे येतोच. आजकाल इतकी यंत्रे निघाली आहेत, मग भगवंताच्या प्राप्तीसाठी संतांनी एखादे यंत्र शोधून काढले नाही का, असा प्रश्न एखाद्याच्या मनात येईल, तर त्याचे उत्तर सोपे आहे. असे यंत्र संतांनी केव्हाच शोधून काढले नाही का असा प्रश्न एखाद्याच्या मनात येईल तर त्याचे उत्तर सोपे आहे. असे यंत्र संतांनी केव्हाच शोधून काढले आहे. त्या यंत्राचे नाव आहे रामनाम. हे यंत्र सर्वांना मिळू शकते, सर्वांना वापरता येते, शिवाय ते कधीच गंजत नाही.

भक्त, भगवंत आणि नाम हे तिन्ही एकरूपच आहेत. जिथे नाम आहे तिथे भक्त आहे, आणि तिथेच भगवंत आहे. म्हणून नाम सर्वांत श्रेष्ठ आहे. ते नाम अनन्य होऊन आपण घेऊ या. नाल्यातून, गटारातून पाणी वाहते, ते किती घाण असते ! पण ते नदीला मिळते आणि ती सागराला मिळते. सागर त्या सर्वांना सागररूप करून टाकतो. तसे मनुष्य कितीही पापी, दोषी, अपराधी असू द्या, त्याने नामनदीची कास धरली की तो रामसागररूप झालाच म्हणून समजा. भगवंताला विसरणे हे सर्वांत मोठे पाप आहे. नामाने भगवंताचे स्मरण होते म्हणून नामाने पाप नाहीसे होईल. अनाथ शब्द नाथावाचून नाही, आणि नाथाला अनाथावाचून नाथत्व नाही. राम सर्वांचा नाथ आहे. त्याच्या अखंड स्मरणात आपण राहू या. प्रपंच वनवासासारखा आहे. रामाच्या स्मरणात प्रपंचातली संकटे आणि दुःखे कस्पटाप्रमाणे वाटतील. .

तुम्ही नाम घेत गेलात तर तुम्हांला संत धुंडीत जाण्याची जरूरीच नाही, तेच तुम्हांला धुंडीत येतील.






विभावरी कुलकर्णी,
मो. ८०८७८१०१९७



## राहतो त्या परिसराची निंदा करू नये.

ज्योतिर्मय साहित्य

काही व्यक्ती अशा दिसतात की, आपण राहतो ते घर व सोसायटी, परिसर याची निंदा करताना दिसतात. आमचे घर किंवा परिसर चांगले नाही म्हणून कोणाला घरी बोलवले जात नाही. आपल्या घरी जाताना अगदी नाईलाज म्हणून जातात. सतत घराला व शेजारी राहणाऱ्या लोकांना नावे ठेवतात. अशा वागण्यामुळे आपण खूप नकारात्मकता आपल्या कडे आणत असतो. खरे तर ज्या परिसराने आपल्याला समाज, शेजार दिला त्या जीवनाधार असलेल्या परिसराची व घराची कधीही निंदा करू नये.

खूप वेळा अशी भावना इतरांशी तुलना केल्यामुळे येते. इतरांची घरे, मोठी सोसायटी, तेथील सुविधा बघितल्या की आपल्या कडे काय नाही याचा विचार आपण करु लागतो. आणि त्यातून नैराश्य येते.

जर थोडा विचार केला तर असे लक्षात येते, आपल्यावर जर कोणतेही संकट आले तर आपल्याला आपल्या घरातच सुरक्षित वाटते. आपल्या परिसरात भीती वाटत नाही. आपल्यावर जर काही वाईट प्रसंग आला तर प्रथम शेजारीच मदतीला धावून येतात.

आपली नोकरी,व्यवसाय जिथे असेल त्या ठिकाणी आपल्याला रहावेच लागते. त्या स्थाना बद्दल मनात नेहेमी कृतज्ञता असावी. त्याला नावे ठेवू नयेत. आपण कितीही संकटात असलो तरी आपल्या घरा जवळच्या परिसरात आपल्याला सुरक्षित वाटते. मानसिक आधार मिळतो. बऱ्याच जणांचे बालपण त्या परिसरात गेलेले असते. त्या वेळी याच ठिकाणी आपण किती आनंदी होतो, किती काळ येथे व्यतीत केला आहे अशा चांगल्या आठवणी आठवाव्यात. जरी त्या परिसरात बालपण गेले नसेल आणि नवीनच राहायला आलेले असलो तरी आपण घर कोणत्या परिस्थितीत घेतले? ते घेतले तेव्हा आपण कसे आनंदी होतो? आपल्याला त्याची किती आवश्यकता होती? या गोष्टी आठवव्यात.

जरी काही गोष्टींची कमतरता असेल तरीही त्या दूर करण्याचा प्रयत्न करावा. गैरसोयी कायम स्वरुपी नसतात. जेथे राहतो त्या परिसरा विषयी आनंदी असावे. परिपूर्ण तर कोणीच नसते. आपल्यातही दोष असतातच. त्या परिसरात काय आहे या कडे लक्ष द्यावे. सदैव दोष, न्यूनत्व बघू नये. चराचर जग हे ब्रह्म आहे. त्या विषयी ममत्व, आपुलकी बाळगावी. म्हणजे दोष दिसत नाहीत आणि परकेपणा वाटत नाही. प्रत्येकाने स्वतःशी विचार करून बघावा मी परिसराला नावे तर ठेवत नाही? आणि याचे उत्तर हो आले तर स्वतःची मनस्थिती बदलावी.



## नीतिशतक निरूपण

अनुवाद आणि निरूपण
ह.भ.प.चंद्रहास शास्त्री सोनपेठकर

ज्योतिर्मय साहित्य

**साहित्यसङ्गीतकलाविहीनः**
**साक्षात्पशुः पुच्छविषाणहीनः।**
**तृणं न खादन्नपि जीवमानः**
**तद्भागधेयं परमं पशूनाम।।**

अर्थ – साहित्य, संगीत आणि कलेने युक्त नसणारा मनुष्य हा शिंग आणि शेपूट नसलेला पशूच आहे जणु. पशूंचे किती भाग्य की, असा मनुष्य गवत न खाता जगतो. नाही तर पशूंना खाण्यासाठी काही शिल्लक राहिले नसते.

कवी भर्तृहरींच्या मते, साहित्य, संगीत आणि कला यांचे जीवनात महत्वाचे स्थान आहे. माणसाचे माणूसपण हे या साहित्य, संगीत, कला इ. च्या अध्ययनात सामावले आहे. जर या विषयांचे अध्ययन नसेल, तर माणूस हा पशूप्रमाणेच असतो, असे प्रतिपादन करताना भर्तृहरी उपरोधाने म्हणतात की, असा पशूसमान असणारा माणूस गवत न खाता जगतो, हे पशूंचे भाग्यच! अर्थात जर अशी माणसे गवत खात असली असती, तर पशूंना चारा कोठून मिळाला असता?




## आरोग्याचे 'पांढरे शत्रू-'

**(मागील अंकावरून)**

**मैदा :** मैदा गव्हापासूनच तयार केला जातो; पण त्यावर प्रक्रिया केली जाते त्यातच सर्व पोषक तत्त्व निघून जातात. त्याशिवाय मैद्यापासून बनवलेल्या पदार्थांमध्ये साठवण क्षमता वाढवण्यासाठी रसायनांचा वापर केला जातो. त्यामुळे शरीराचे नुकसान होते.

आरोग्याच्या समस्या : मैद्याला ग्लू ऑफ गटस् म्हणतात. त्यात फायबर किंवा तंतुमय घटकांचे प्रमाण शून्य असते. त्यामुळे पचनसंस्था मंदावते, जड होते. पचन मंदावल्यामुळे चयापचयही मंदावते. त्यामुळे वजन वाढते, तणाव, डोकेदुखी आणि मायग्रेनच्या समस्या वाढण्याची शक्यता वाढते. गव्हापासून मैदानिर्मितीच्या प्रक्रियेत चोकर वेगळे काढले जाते जे पचनासाठी आवश्यक असते. मैद्याचे सेवन केल्याने वाईट कोलेस्टेरॉलची पातळी वाढते. त्यामुळेच अनेक आरोग्य समस्या जसे मधुमेह, उच्च रक्तदाब आदी होतात.

पर्याय काय? : मैदा कमी प्रमाणात कधी तरी खाऊ शकतो. त्याच्या अतिसेवनापासून बचाव करा. त्याऐवजी आरोग्यदायी काही पर्याय निवडावा. सामोसा खायचा तर कणकेचा वापर करावा. नान करण्यासाठी एक भाग गव्हाचे पीठ, एक भाग ज्वारीचे पीठ आणि एक भाग बाजरीचे पीठ मिसळावे. गव्हाच्या पीठाचा ब्रेड, नूडल्स आणि पास्ता, मॅक्रोनीचे सेवन करावे. हल्ली बाजारातही गव्हापासून केलेले हे सर्व पदार्थ मिळतात. गव्हाच्या पिठापासून बनवलेले काही पदार्थ काही काळ साठवूनही ठेवता येतात.

मीठ : अनेकांना पदार्थात मीठ जास्त लागते. त्यांना खारट आणि मसालेदार पदार्थांची



चव अधिक आवडते; पण या गोष्टी आरोग्यासाठी हानिकारक ठरतात. जागतिक आरोग्य संघटनेनुसार मीठ किंवा टेबल सॉल्टचे सेवन प्रतिदिन ५ ग्रॅमपेक्षा जास्त प्रमाणात करू नये.

संकलन –
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क – ९२ ७१ ६६९ ६६९

मिठाने वाढतो धोका : सामान्यपणे शरीराचे कार्य योग्यरीतीने चालावे, यासाठी मिठाचे सेवन केले पाहिजे. मात्र, अतिप्रमाणात मिठाचे सेवन हे गंभीर आजारांना आमंत्रण देणारे असते; पण जास्त मीठ खाल्ल्याने उच्च रक्तदाब, हायपर टेन्शन आदी समस्या निर्माण होतात. सतत हायपर टेन्शनचा त्रास होत असल्यास हृदयरोग, लकवा आणि मूत्रपिंडाच्या समस्या निर्माण होण्याची शंका असते. तसेच जास्त मिठाचे सेवन केल्याने रक्तात लोहाची कमतरता निर्माण होते. त्यामुळे ॲसिडिटी वाढते आणि भूक लागली नसेल तरीही भूक लागल्याची जाणीव होत राहते. त्यामुळे जास्त प्रमाणात खाल्ले गेल्याने स्थूलता वाढते.

मिठाचे सेवन कसे कमी करावे : आहारात जास्त मीठ सेवन करू नये, खार्या पदार्थांचे सेवन कमी करावे, दह्यामध्ये मीठ घालू नये. तेलकट पदार्थ कमी सेवन करावेत. कच्चे सॅलड खाताना मीठ टाकू नये. पापड, चटणी आणि प्रक्रिया केलेले पदार्थ कमी प्रमाणात सेवन करावेत. ज्या व्यक्तींना हृदय, किडनी किंवा **(क्रमशः)**

।। श्री स्वामी समर्थ ।।





ज्योतिर्मय साहित्य

स्वामी म्हणतात – पावसाचे थेंब छोटे जरी असले तरी त्याचे सतत पडत राहणे हे एका मोठ्या नदीला जन्म देतात त्याच प्रकारे रोजचे पाठवलेले छोटे-छोटे सूविचार जीवनात मोठे परिवर्तन घडवू शकतात.. ''सुख'' फुलासारखं असावं जे दररोज उमलत रहावं... ''दुःख'' हे गळणाऱ्या पानासारखं असावं जे क्षणात निघून जावं...

स्वामी म्हणतात – समजूत घालायला कुणी नसलं की स्वतःलाच बळ आणावं लागत !! ज्यांचे डोळे चांगले ते जगाच्या प्रेमात पडतात, पण ज्यांची जीभ गोड असेल तर जग त्यांच्या प्रेमात पडते...! एक व्यक्ती म्हणून मोठं होताना, कधीही माणूस म्हणून छोटे होऊ नका...

# रवींद्रनाथ टागोर

विश्वास देशपांडे,
चाळीसगाव
मो. ९४०३७४९९३२


## रवींद्रनाथ टागोर : वारसा आणि कार्य

**ज्योतिर्मय साहित्य**

मुलं कशी घडतात त्याचं हे सुंदर उदाहरण आहे. रवींद्रनाथ आपल्या वडिलांच्या मार्गदर्शनाखाली संस्कृत, इंग्रजी, उपनिषदे, खगोलशास्त्र इ. विषय तर शिकलेच पण आपल्या वडिलांकडून निसर्गाचे प्रेम त्यांनी घेतले. त्या निसर्गरम्य भागातील आत्म्याला प्रसन्नता देणारी शांतता त्यांनी अनुभवली. सकाळच्या वेळी झाडाच्या शेंड्यावर चालणारा सोनेरी सूर्यकिरणांचा मोहक खेळ, नदीचे सकाळच्या वेळी शांत असणारे पात्र, पक्ष्यांची किलबिल, सूर्योदय आणि सूर्यास्ताच्या वेळी पूर्व आणि पश्चिम क्षितिजावर होणारी विविध रंगांची उधळण त्यांना मोहून टाकत असे.

देवेंद्रनाथ पुढे उत्तर भारतात प्रवासाला गेले. या प्रवासात त्यांनी छोटया रवीला सुद्धा आपल्या बरोबर नेले होते. तेथून ते पुढे हिमालयात गेले. या प्रवासात रवीचे शिक्षण आपोआप घडत होते. निसर्गाचे निरीक्षण, वडिलांबरोबर केलेली विविध विषयांची मनमोकळी चर्चा यामुळे बालमनावर संस्कार घडत होते. हिमालयाची भव्यता, निसर्गातील शांतता आणि समृद्धता पाहून मन विशाल होत होते. संकुचितता, मनाचे मालिन्य आणि विचारांचे दारिद्र्य यांना कोठेही थारा नव्हता. चार भिंतींच्या शाळेत शिक्षण घेण्यापेक्षा निसर्गाच्या सहवासात प्राप्त झालेलं हे अनोखं आणि अनौपचारिक शिक्षण आनंददायी होऊ शकतं याची जाणीव त्यांना याच वयात झाली. त्यांच्या मनात असणारी शांतिनिकेतनची कल्पना इथूनच साकार व्हायला सुरुवात झाली.

रवींद्रनाथांनी शांतिनिकेतनची कल्पना प्रत्यक्षात आणण्यापूर्वी त्यांचे व्यक्तिमत्व कसकसे समृद्ध होत गेले ते आपण गेल्या काही भागांपासून पाहतो आहोत. ते समजून घेतल्याशिवाय आपल्याला त्यांच्या शांतिनिकेतन मागील विचार आणि त्यांच्यातील शिक्षण विषयक भूमिकेचे आकलन होणार नाही. सुप्रसिद्ध नाटककार बर्नाड शॉने एका ठिकाणी असं म्हटलंय की माझ्या विकासाच्या आड प्रामुख्यानं काही आलं असेल तर ती म्हणजे माझी शाळा ! हे वाक्य आजही आपल्याला ऐकायला धक्कादायक वाटतं पण ते सत्य आहे. त्यांचेच समकालीन असलेल्या रवींद्रनाथ टागोरांचे विचारही असेच होते. **(क्रमशः)**




## रंजक बालकथा : पॅडीची गोष्ट

**ज्योतिर्मय साहित्य**

**पुस्तक परीक्षण**

ज्योती सोनवणे,संभाजीनगर
मो.९९६०१६२८३०

उमेश मोहिते यांचा हसरी मुले नंतरचा पॅडीची गोष्ट हा दुसरा बालकथासंग्रह इसाप प्रकाशन, नांदेड यांनी नुकताच प्रकाशित केला असून यात बालकुमारांचे भावविश्व चितारणाऱ्या एकूण चौदा रंजक बालकथा आहेत.या कथांमधील मुले शाळकरी वयातील असून त्यांचे कोमल,संवेदनशील नि आनंददायक भावजीवन लेखकाने अगदी तन्मयतेने शब्दबध्द केले आहे आणि त्यामुळे कथांतर्गत ही सारी मुले जिवंत नि रसरशीत झाली आहेत, याचा प्रत्यय ह्या बालकथा वाचताना येतो. या बालकथांमधून मुलांचे आचार-विचार, राग-लोभ नि रुसवे-फुगवे अगदी सामर्थ्याने टिपले गेले आहेत. नेटके नि नेमके संवाद, प्रभावी निवेदन व ओघवत्या लेखन शैलीमधून केलेले हे लिखाण असल्यामुळे पॅडीची गोष्ट मधील बालकथा मनोरंजक झाल्या असून त्या भावस्पर्शीही झाल्या आहेत. कथांतर्गत ही सर्व मुले आपल्या भवतालातील परिचयाची वाटतात आणि म्हणून भावतात.मग पॅडीची गोष्ट कथेत मित्राला मदत करणारा छोटा पॅडी असो किंवा प्रॉमीस कथेतील साऱ्या वर्गाला अभ्यासाची प्रेरणा देणारा बाळू असो ; वा सई कथेतली मैत्रिणीवर जिवापाड माया करणारी छोटीशी सई असो , नाहीतर शाब्बास रघू कथेतला घरच्या गरिबीमुळे भाजी विकून शाळा शिकणारा रघू असो वा सुंदर हस्ताक्षरामुळे सरांच्या कौतुकास पात्र ठरलेला गौरव असो.. ही सर्वच मुले वाचक मनाला त्यांच्या हळव्या नि नाजूक बालविश्वात घेऊन जातात आणि वाचकमन सुखावून जाते.सोबतच कष्ट करावे परी शिक्षणाची कास कधीच सोडू नये , विद्यार्थ्यांनी नित्यनेमाने अभ्यास केला पाहिजे या प्रकारच्या बाल-कुमारांना भविष्यात उपकारक ठरतील अशा छानशा संस्कारांची गुंफणही या कथांमधून लेखकाने अगदी कौशल्याने नि बेमालूमतेने केली असल्याने या कथा रंजक,वाचनीय नि संस्कारक्षम झाल्या आहेत. आणि म्हणूनच ह्या कथा मुलांना नक्की आवडतील. थोडक्यात बाल-कुमार वाचकांसोबतच प्रौढ वाचकांच्याही पसंतीस पडून त्यांना बालविश्वाचा पुनःप्रत्यय देतील, असा सार्थ विश्वास वाटतो.

पॅडीची गोष्ट : ( बालकथा )
लेखक : उमेश मोहिते
प्रकाशक : इसाप प्रकाशन,नांदेड
( मो.७६६६१८६९२८ )
पृष्ठे : ६४ मूल्य : १२० रु.
मुखपृष्ठ : शीतल शहाणे

# नावापुरती उरलीत नाती....

**ज्योतिर्मय साहित्य**

गोड नाजूक नात्याला
लागु नये रे नजर
आपुलकी,प्रेमभाव
असे हक्काने हजर...

तुझे न माझे नाते, एक अनमोल विचार धागा..ज्याची किंमत कोणताच करोड पती करू शकणार नाही? असे अबोल, जिव्हाळ्याचे, हक्काचे, स्नेहाचे नाते असते. जे फक्त आपले असते. ज्यात माया, ममता, स्नेह, प्रेम ठासून भरलेले असते. कोणत्याच दृष्ट, माणुसकी हिन प्रवृत्तीने ते दूषित होवू शकत नाही, कारण त्यात विश्वास खूप महत्त्वाचा असतो.प्रत्येक नाते हे विश्वसावर टिकत असते. विश्वास नावाचा पक्षी जेव्हा उडून जातो तेव्हा ते नाते खोकळे बनते...त्यात काही राम नसतो.. तो फक्त दिखावा असतो. बंध पाळायचे म्हणून ते नाते पाळले जाते. आतून आंतरिक ओढही नसते की, समाधान नसते की, इच्छा नसते.. फक्त समाजासाठी दिखावा.

सर्वात पवित्र नाते आईच्या गर्भात असणाऱ्या बाळाचे त्याच्या आईशी असते. त्याच्या शिवाय ती व तिच्याशिवाय ते बाळ अपूर्णच असते. त्यांच्या प्रेमाला कशाचीच उपमा देता येणार नाही की, कोणाशी त्याची तुलनाही करता येणार नाही. स्वर्गाहून सुंदर असे त्यांचे पवित्र, निरागस नाते असते. त्याच्या प्रत्येक हालचालीने तिला किती आनंद होतो.. तिला जे समाधान मिळते..आई होण्याचे ते अतुलनीय आहे. आई बनणे इतके सोपे नसते ओ.तिचा तो दुसरा जन्म असतो. त्यास ती पूर्ण तयार असते. तिची बाळाला पाहण्याची आतुरता शिगेला पोहोचलेली असते.त्याच्या एका रडण्याच्या आवाजाने ती तिच्या साऱ्या वेदना कधीच विसरून जाते.. अन् त्या लेकरावर जीवापाड प्रेम करते.

अन् हेच बाळ जेव्हा मोठे होते तेव्हा हेच चित्र बऱ्याचदा वेगळे होते. त्याला ९९.९९% आपल्या आईच्या वेदना आठवत नाही की, प्रेम, वात्सल्य, जिव्हाळा आठवत नाही. तेव्हा तिचे काळीज आतून किती तुटत असेल. याचा थोडा तरी विचार ते करते का?तिच्याच हाडामासाचा गोळा



असतो ना तो.. त्याला सुख देणे माहिती नसते, पण दुःख तरी का देतो? कित्येकदा तो तिला फक्त दुःख देण्यासाठीच जन्मला का असे तिला वाटू लागते? असे ९९% घरात असेच चित्र दिसते. एखादा टक्के मुल आईला,बापाला शांती,समाधान,प्रेम देत असते.त्यांना तुमचा पैसा, अडका, कपडा-लत्ता काही नको असते. हवा असतो एक शब्द प्रेमाचा.. आपुलकीने चौकशी करण्याचा. जेवले का? बरे आहे का? कोठे बाहेर जायचे का? काही हवे का? असे साधे - साधे प्रश्न जरी विचारले.. थोडा वेळ जवळ आपुलकीने चौकशी जरी केली तरी स्वर्ग सुख लाभते.एक इंच अधिक मांस चढते, आनंदाने मरण स्वीकारतात. आपले लेकरू सत्कार्य करणारे असावे,निर्व्यसनी असावे, कधीही खोटे न बोलणारे असावे,माघारी न बोलणारे असावे, नाही प्रेम तर दुःख तरी त्याने देवू नसे असे प्रत्येक आई बापाला वाटते..यात चुकीचे काय. एखादा जरी चुकीचा शब्द आपल्या लेकराने उच्चारला तरी जीवन नकोसा वाटतो..आई बापाला.. आपण हेच संस्कार दिले का? कोठे कमी पडलो?काय कमावले जीवनात येवुन..नको हे जीवन...असे कित्येक वेळा आई बाप जिवंतपणी मरतात.. कारण या यातना खूप भयाण असतात हो. ज्याच्या वाट्याला हे दुःख येते त्यालाच हे समजते. शत्रूच्या वाट्याला ही असे दुःख जावू नये.

जेव्हा एक आई, मुलांना त्यांच्या बापाविना वाढवते ? लहानाचे मोठे करते? कोण कोणत्या संकटाचा सामना तिला करावा लागतो, कोण कोणत्या बदनामीला तिला तोंड द्यावे लागते? तिची चुकी नसतांना? तिला विनाकारण बदनाम केले जाते? त्या




सौ.प्रतिमा अरुण काळे
निगडी प्राधिकरण पुणे,४४
मो.न.८८३०६५४६६१

गोष्टी कडे दुर्लक्ष करून, आत्महत्येचा विचार सोडून आपल्या मुलांना ती वाढवते तरी त्या मुलांना आपल्या आई या नात्याची किंमत उरत नाही.. तेव्हा ती आतून तुटते... अन् ते ही संपूर्ण.हीच तिची मुले का? ज्यांना तिने एकटीने वाढवले? ती चुकली ही असेल,तिने ते मान्य ही केले असेल, पण तरी तिलाच ते दोष देतात.. तिचा अपमान करतात, माघारी बोलतात, घरात बसून आयते खातात, तरी रुबाब त्यांचाच असतो..आपली जबाबदारी ही समजत नाही.कुटुंबाची जबाबदारी कोण स्वीकारेल. बापविना मुले वाया गेले असे कोणी म्हटले तर त्या मायला सहन होईल का? तिच्या जिवंतपणी तिच्याच मृत्युला कोण जबाबदार? तिला जगण्याचा, हसण्याचा, नटण्याचा, हिंडण्याचा, तुम्हाला प्रश्न विचारण्याचा, रागवण्याचा काहीच अधिकार नाही का? तिने फक्त दिनरात त्यांच्यासाठी कष्ट घेत रहायचे. तेव्हा तिला काय वाटतं असेल.बापासारखी ती ही यांना नसती तर... मुले झालीच असती ना मोठी? विनाकारण आपण जगलो का? असे नाना विचार तिच्या डोक्यात साहजिकच येत असणारच.

कधी सुटेल का हा नात्यांचा गुंता.. या जगात खरचं कोणीच कोणाचे नसते. सगळी नाते स्वार्थी वाटतात. ती आई -बाप व मुले, नवरा - बायको, मित्र-मैत्रिण, भाऊ-बहिण इत्यादी.प्रत्येकात स्वार्थ दडलेला दिसतो.. निस्वार्थी असे कोणतेच नाते नाही का? मैत्रीत बोललो नाही तर.. लगेच दुरावा निर्माण होत असेल तर ती कसली मैत्री. मुलांच्या प्रमाणे आई बाप वागले नाही तर लगेच मुले त्यांना मारहाण करतात, शिव्या देतात, मोठ्याने बोलतात, माघारी बोलतात, नको त्या धमक्या देतात .. असे कसले रक्ताचे नाते?पती पत्नी मध्ये थोडे वैचारिक वाद विकोपाला जातात...घटस्फोट, खून पर्यंत प्रकरणे जातात तेव्हा ते तरी कसले ओ नाते?

गुरू, शिष्य नाते.. हे तरी नाते आहे टिकले पाहिजे..त्याचा योग्य सन्मान झाला पाहिजे. गुरूने शिष्याला कायम उत्तम शिक्षा दिली पाहिजे.सत्य असत्याची जाणं करून देणे गरजेचे आहे. त्यास स्वावलंबी बनवणे गरजेचे आहे. सुशिक्षित करणे गरजेचे आहे.. विचाराने प्रगल्भ करणे गरजेचे असते. व्यावसायिक, सामाजिक,भावनिक,शैक्षणिक, राजकीय सारे शिक्षण देणे गरजेचे आहे. आपला शिष्य कोठेच कमी राहता कामा नये.. या साठी नित्य त्याने तत्पर राहणे गरजेचे आहे. शिष्याने गुरू कडून कान मंत्र, गुरू मंत्र घेतला पाहिजे.. अन् गुरु दक्षिणा स्वरूप आपले आचरण शुद्ध ठेवले पाहिजे.सर्व कलात प्राविण्य प्राप्त केलेले असावे.सतत काही तरी घेण्याची वृत्ती असावी...या विश्वात घेवू तितके ज्ञान कमी आहे.

जगा अन् जगू द्या... माणुसकीचे पुजारी व्हा!! शांततेचे पाईक व्हा!! नात्यांची गुंफण समजून घ्या.प्रत्येक नात्याची जाणं ठेवा, कदर करा, एकमेका वेळ द्या.मानव समाज प्रिय प्राणी आहे..तो एकटा राहूच शकत नाही.त्यामुळे या नात्यांच्या चौकटीत तो आपोआप बांधला जातो...पण, तेथे आपला जीव घुटमळणार नाही याची काळजी घ्यावी. कोणत्याच नात्याचे ओझे वाटणार नाही,जेथे सुरक्षित वाटेल, आनंद मिळेल,प्रेम मिळेल,आपुलकी मिळेल..जेथे स्नेह असेल..तळमळ असेल,जिव्हाळा असेल, माया असेल.. असे नाते प्रत्येकाने टिकवले पाहिजे.किती पैसा असला तरी एक साधा पैसा ही सोबत घेवून जात नाही.. मागे उरतात त्या फक्त चिरकाल आठवणी..त्या आठवणी आनंदी असल्या पाहिजे,त्याने गालावर छोटेसे का होईना हसू आले पाहिजे.असे नाते जोपासले पाहिजे,टिकवले पाहिजे, जपले पाहिजे.

माणूस म्हणून जन्मा आला
नात्यांच्या चौकटीत बांधला
जीवनाच्या खडतर वाटेवर
त्यात गोड रमला, आनंदला...

## रंजना सानप यांना रंगकर्मी प्रतिष्ठानचा राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर

**ज्योतिर्मय साहित्य**

उदगीर रंगकर्मी साहित्य कला क्रीडा प्रतिष्ठानच्या वतीने प्रधान केले जाणारे राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर झाले आहेत साहित्य कला क्रीडा पर्यावरण इ. क्षेत्रात भरीव कार्य करणाऱ्या व्यक्तींना हे पुरस्कार दिले जातात. रंगकर्मी प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्राध्यापक विभीषण मद्देवाड व सचिव ज्योती मद्देवाड यांनी हे पुरस्कार जाहीर केले.साहित्यिक क्षेत्रातील कार्यासाठी रंजना सानप यांना ८ फेब्रुवारी रोजी मान्यवरांच्या उपस्थितीत हा पुरस्कार देण्यात येणार आहे. आतापर्यंत सानप यांना साहित्यिक व शैक्षणिक क्षेत्रातील कार्यासाठी अनेक पुरस्कार देऊन गौरविण्यात आले आहे या पुरस्कारा निवडीबद्दल लेखक, प्रकाशक



कथाकार डॉ. भास्कर बडे सर, लेखक, गीतकार प्राध्यापक रामदास केदार सर,एकता फाउंडेशनचे अध्यक्ष लेखक, कवी अनंत कराड सर व विविध क्षेत्रातून सानप यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

## आशियाई स्पर्धेत आर्यन व शर्वरी ला सुवर्णपदक व रौप्यपदक




**ज्योतिर्मय साहित्य**

पुणे येथील बालेवाडी क्रीडा संकुल येथे दिनांक २९ जानेवारी ते ३१ जानेवारी २०२५ दरम्यान झालेल्या पहिली आशियाई तायक्योंन चॅम्पियनशिप स्पर्धेत छत्रपती संभाजीनगर येथील डायनॅमिक फिजिकल मार्शल आर्ट क्लासेस(ऑक्टोझोन सोसायटी, नक्षत्रवाडी) येथील खेळाडू आर्यन विशाल त्रिवेदी( सुवर्ण पदक) , शर्वरी राहुल अकोलकर (रौप्य पदक) यांनी प्रशिक्षक कृष्णा चव्हाण सर यांच्या मार्गदर्शनाखाली सदर स्पर्धेत घवघवीत यश मिळविले आहे त्याबद्दल सर्व विजेत्या खेळाडूंचे अकॅडमी तर्फे अभिनंदन करण्यात आले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

## उमन्स व्हॉलीबॉल कप २०२५ उत्साहात संपन्न




**ज्योतिर्मय साहित्य**

महिला सक्षम करण्यासाठी व मुली व महिलांसाठी व्हॉलीबॉल खेळाडूंसाठी एक व्यासपीठ त्यांना भेटावे व जास्तीत जास्त मुलींनी व्हॉलीबॉल खेळाशी निगडित राहावे याकरिता व्हीएलसी व्हॉलीबॉल अ‍ॅकॅडमी व डिकॅथलॉन यांच्या संयुक्त विद्यमाने वुमन्स व्हॉलीबॉल कप स्पर्धा घेण्यात आली.

या स्पर्धेत १७ वर्षाखालील मुली या गटात १७ संघांनी सहभाग नोंदवला तसेच ग्रामीण व शहर संपूर्ण संभाजीनगर जिल्ह्यातील खेळाडू यात सहभागी झाले होते जवळपास १५० खेळाडूंचा या स्पर्धेमध्ये सहभाग होता.

डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ येथील व्हॉलीबॉल च्या मैदानावर या स्पर्धा झाल्या यामध्ये प्रथम क्रमांक सभू प्रशाला वडोद बाजार तसेच द्वितीय क्रमांक एस बी हाय स्कूल आणि तृतीय क्रमांक बळीराम पाटील विद्यालय तसेच गजानन विद्या मंदिर येथील संघांनी बाजी मारली.

या स्पर्धेकरिता लोकेश ठाकरे अभिषेक गणोरकर आदिती बागुल अंकिता तुपे अनिकेत शेटे श्री घोडके यश मगरे शुभम पंडित धीरज बडे युवराज बोर्डे यांनी या स्पर्धेसाठी परिश्रम घेतले व बक्षीस समारंभ हा सुनील भास्करराव खोचे सुनील कुलकर्णी विभागीय सचिव श्री सतीश पाठक यांच्या हस्ते झाला सूत्रसंचालन अभिषेक गणोरकर यांनी केले प्रत्येक संघाला उत्कृष्ट खेळाडू तसेच एक सन्मानचिन्ह व डिकॅथलोन तर्फे गिफ्ट देण्यात आले.



# गाइदिन्ल्यू ही नागाओंकी रानी है ।

**ज्योतिर्मय साहित्य**
**(मागील अंकावरून)**

नेतृत्वाखाली आसाम रायफल्सने १७ ऑक्टोबर १९३२ रोजी अचानकपणे हल्ला करून गाइदिन्ल्यू आणि त्यांच्या साथीदारांना अटक केली. त्यांना इंफाळला आणून त्यांच्यावर कोर्ट खटला चालविला गेला. अवघ्या १७ वर्षाच्या गाइदिन्ल्यूस जन्मठेपेची शिक्षा देण्यात आली. दोन महिने कोहिमा, पाच महिने इंफाळ, एक वर्ष गुवाहाटी, सहा वर्षे शिलाँग, तीन वर्षे आई झोल मिझोराम व उर्वरीत काळ तुरा तुरुंगात स्वातंत्र्य संग्रामासाठी त्यांना अत्यंत कष्टमय तुरुंगवास भोगावा लागला.



पंडीत जवाहरलाल नेहरू १२ दिवसांच्या प्रवासासाठी आसाममध्ये १९३७ साली गेले होते. तेव्हा ते म्हणाले की, ‘‘मी आपल्या १२ दिवसांच्या प्रवासाचा विचार केला तेव्हा असे वाटले की, येथील यात्रा स्वप्नवत वाटते आहे. मी त्या गाइदिन्ल्यू या स्वातंत्र्यवीरांगणेबाबत विचार करतो, तेंव्हा जाणवते ते हे कि, ही तर नागालोकांची राणी आहे. जी आज इंग्रज शासनाच्या अन्यायकारक धोरणांमुळे काळकोठडीमध्ये स्वातंत्र्यलढ्यासाठी खडीफोडण्याचे कष्ट घेत आहे. तिचे विचार किती उत्तम आहेत. तिच्या वेदना, तिचे स्वप्न, तिचे जीवन किती उच्च कोटीचे आहे. असे सांगून पंडीत नेहरूंनी गाइदिन्ल्यूचे शौर्य व साहसाची प्रशंसा केली. जून १९३८ मध्ये नेहरूंनी ब्रिटिश प्रभावशाली खासदार लेडी नैन्सी एस्टरल यांना गाइदिन्ल्यू यांना सोडण्याचा आग्रह केला. परंतु आसामचे इंग्रजी शासन गाइदिन्ल्यू यांना सोडण्यास तयार नव्हते. त्यांचे म्हणणे होते कि, गाइदिन्ल्यू यांना सोडले तर मणिपूर चे नागाक्षेत्र, नागा हिल्स, उत्तर कछार हिल्स आणि सिकीर हिल्स येथील सशस्त्र आंदोलन परत डोके वर काढेल. या कारणामुळे भारत सरकारचे सचिव यांनी राणी गाइंदिन्ल्यू यांना तुरुंगातून सोडण्याचा आग्रह अमान्य केला. ब्रिटीश संसदेने गाइदिन्ल्यूला उत्तर पूर्व भारताची दहशत ही पदवी दिली. गाइदिन्ल्यू यांचा त्याग भारताच्या स्वातंत्र्य संग्रामात खूप महत्वपूर्ण होता. संपूर्ण भारत स्वातंत्र्यासाठी व्याकूळ झाला असताना त्या तुरूंगात राहून स्वातंत्र्यलढा चेतविण्याचे कार्य करीत होत्या. पंडित नेहरू म्हणाले, ‘‘ गाइदिन्ल्यू ही नागाओंकी रानी है।‘‘. तेव्हापासून म्हणजे १९३७-३८ पासून ‘‘रानी गाइदिनल्यू माँ ‘‘ हा शब्द प्रचलित झाला. पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांनी आसाम व मणिपूर सरकारला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर स्पष्ट निर्देश दिले की राणी गाइदिन्ल्यू यांना ताबडतोब सोडा. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर १४ ऑक्टोबर १९४७ रोजी राणी गाईदिन्ल्यू’ यांची शेवटी विवश होऊन तुरुंगातून सुटका करण्यात आली.पंधरा वर्षे तुरुंगावास भोगलेल्या आणि अवघ्या ३२ वर्षे वय असलेल्या राणी गाइदिन्ल्यू यांना आसाम सरकारने जेलियागरांग क्षेत्रात जाण्यासाठी परवानगी दिली नाही. त्यावेळी आसाममध्ये भारतविरोधी वातावरण होते. त्याकाळातील आसाममधील विशेषतः ख्रिश्चन समाज आणि चर्च हेच इच्छित होते की, जेलियांगरांग समाजाचा शेष हिंदू समाजाशी संबंध येऊ नये आणि त्यात ते यशस्वी झाले. १९५१ पर्यंत राणी गाइदिन्ल्यू यांचे वास्तव्य नागा हिल्सच्या मोकोक्चुंग जिल्ह्यातील चांग गावात छोटाभाऊ खिऊनासिंग यांच्याकडे होते.

१९५३ ला पंडित जवाहरलाल नेहरू मणिपूर व आसाममध्ये आले असता, राणी गाइदिन्ल्यू यांनी जेलियांगरांग नागांच्या समस्या त्यांच्या कानावर घातल्या व त्या दूर करण्याचा आग्रह केला. नेहरू यांनी ताबडतोब त्यांना स्वातंत्र्य सेनानी दर्जा देत पेन्शन चालू केली तसेच सुविधा उपलब्ध करून दिल्या. पंडीत नेहरू यांच्याबइल असलेला आदर हा १९३७ पासूनच राणी गाइदिन्ल्यू यांना होता. ज्यावेळी १९३७ साली आसाममध्ये प्रवासासाठी नेहरू आले होते तेव्हा त्यांनी गाइदिन्ल्यू यांचा पराक्रम कळल्यामुळे शिलाँगच्या तुरुंगात त्यांची भेट घेऊन त्यांना आश्वस्त केले होते. आपण तर नागांच्या राणी आहात या नेहरूंच्या शब्दाने त्या संपूर्ण भारतभर ओळखल्या जाऊ लागल्या आणि भारतीय स्वातंत्र्यलढ्याशी जोडल्या गेल्या. अध्यात्मिक आणि राजकीय नेत्या असलेल्स गाइदिन्ल्यू यांना, जेंव्हा फिजोच्या नेतृत्वाखाली नागा नॅशनल कौन्सिल ने नागालँडला भारतातून वेगळे करण्यासाठी उत्पात सुरू केला तेंव्हा दुसऱ्यांदा भूमिगत व्हावे लागले.चर्च व नागा नॅशनल कौन्सिल दोघे मिळून जेलियांगरांग व संसारी हिंदूना साम, दाम, दंड, भेद वापरून ख्रिश्चन बनवीत होते. राणी गाइदिन्ल्यू यांना जीवे मारण्याची धमकी देत होते. परंतु राणी गाइदिन्ल्यू माँने यांची कधीच परवा केली नाही. १९६० मध्ये त्यांनी हेरका संस्कृतीचे संरक्षण करण्यासाठी योजना आखली. आणि आपल्या मागण्यांना बळकटी देण्यासाठी १९६१ ते १९६५ पर्यंत भूमिगत राहून आंदोलन चालविले. पाच व सहा जानेवारी १९६६ ला भारत सरकार व राणी गाइदिन्ल्यू यांची चर्चा होऊन १६ जाने. १९६६ ला त्यांनी आत्मसमर्पण केले. राणी गाइदिन्ल्यू यांनी घोषणा केली, ‘‘ मी एक भारतीय नागरीक आहे. भारत देश आमचा आहे. मी हिंदू आहे व सनातन हिंदूधर्म आमचा आहे.‘‘ नागालँड राज्य सरकारने घोषणा केली की, जेलियांगरांग क्षेत्राचा विकास केला जाईल. नागालँड सरकारने कोहिमामध्ये राणी गाइदिन्ल्यू साठी घराची सोय केली. त्यांना कमांडो, कर्मचारी दिले. त्यांचे शालेय शिक्षण झाले नसले तरी, देश व समाजाच्या सर्व गोष्टी त्यांना माहित होत्या. राष्ट्रहिताच्या ज्या गोष्टी योग्य वाटायच्या, त्यासाठी जीवाची पर्वा न करता ते काम त्या पूर्णत्वास न्यायच्या. पंडीत जवाहरलाल नेहरू, इंदिरा गांधी, मोरारजी देसाई, राजीव गांधी या पंतप्रधानांशी राणी गाइदिन्ल्यू यांचे चांगले संबंध होते. भारत सरकारबरोबर झालेल्या करारानुसार उर्वरित आयुष्यभर त्यांनी आपली राष्ट्रीय एकात्मतेची चळवळ सुरूच ठेवली. गाइदिन्ल्यू यांनी गाजविलेल्या पराक्रमामुळे त्यांचा उल्लेख नागालँडची राणी लक्ष्मीबाई असाही केला जातो. मणिपूरची स्वातंत्र्य चळवळ, जी त्यांनी पुढे नेली ती पंडीत नेहरू यांच्या मदतीने भारतीय स्वातंत्र्य चळवळीशी जोडली गेली. मणिपूरमधील लोकांत राजकीय स्वातंत्र्याची जाणीव निर्माण करण्यात त्यांचे योगदान मैलाचा दगड ठरले. १९८५ साली वनवासी कल्याण आश्रमाच्या भिलाई येथे झालेल्या पहिल्या महिला संमेलनाच्या त्या अध्यक्षा होत्या. आपल्या भाषणात त्या म्हणाल्या, ‘‘आपण आपल्या देशाचं ,धर्माचं,भारतीय संस्कृतीच संरक्षण केलं पाहिजे. मी हिंदू आहे आणि मला त्याचा अभिमान आहे.‘‘

राणी गाइदिन्ल्यू यांना त्यांच्या क्रांतीकार्यासाठी १९७२ साली स्वातंत्र्यसेनानी ताम्रपत्र देऊन गौरवण्यात आले तसेच भारत सरकारतर्फे १९८२ साली पद्मभूषण देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. १९८३ साली विवेकानंद सेवा सन्मान पुरस्कार त्यांना देण्यात आला. १७ फेब्रुवारी १९९३ साली वयाच्या ७८ व्या वर्षी राणी गाइदिन्ल्यू यांचे निधन झाले. ५ दिवस जनतेच्या दर्शनासाठी पार्थिव ठेवण्यात येऊन २१ फेब्रु. १९९३ रोजी त्यांच्यावर लुकाऊ या त्यांच्या गावी अंतिम संस्कार करण्यात आले. भारतमातेची ही वीरांगना अत्यंत प्रतिकूल परिस्थतीत कोणतेही लौकिक शिक्षण नसताना, आपला धर्म , संस्कृती, परंपरांच्या रक्षणासाठी तसेच इंग्रज शासनाच्या जुलमी अन्यायी अत्याचारी विरुद्ध स्वातंत्र्यलढ्यात झुंजली. त्यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ १९९६ मध्ये पाच रुपये मूल्याचे भारत सरकारने एक टपाल तिकीट काढले. त्यांच्या नावाने विविध योजनाही राबवल्या जातात, जसे की ‘राणी गाइदिन्ल्यू महिला विकास योजना’. त्यांचे यथोचित स्मारक लुकाऊ गावी होत आहे. २०१४- २०१५ हे वर्ष त्यांच जन्मशताब्दी वर्ष म्हणून साजर करण्यात आले. कल्याण आश्रमाने त्यांच देशासाठीचं योगदान लक्षात घेऊन त्यांच चरित्र संपूर्ण देशभर प्रसारीत केलं. अखिल भारतीय वनवासी कल्याण आश्रमातर्फे २६ जानेवारी हा दिवस नारी शक्ती दिवस म्हणून साजरा करण्यात येतो. १५ ऑगस्ट २०२१ रोजी भारताच्या स्वातंत्र्यदिनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राष्ट्राला संबोधित करताना लालकिल्या वरून वीरांगना झाशीची राणी लक्ष्मीबाई, चेनम्मा व ईशान्य भारतातील मणिपूरच्या राणी गाइदिन्ल्यू माँ यांचा विशेष उल्लेख केला होता. लालबहाद्दूर शास्त्री पंतप्रधान असताना त्यांची भेट घेऊन स्वतंत्र झेलियांग्रोग प्रशासकीय विभागाची मागणी करून यश संपादन केले. २०१६ मध्ये भारतीय तटरक्षक दलाने आयसीजीएस राणी गाइदिन्ल्यू नावाची एक गस्ती नौका त्यांच्या नावाने समर्पित केली. १९९६ साली मरणोत्तर भगवान बिरसा मुंडा पुरस्काराने पण त्यांना सन्मानित करण्यात आले. सर्वात त्यांचे महत्वाचे कार्य म्हणजे भारताच्या एकात्मतेसाठी महत्वपूर्ण भूमिका बजावत नागा नॅशनल कौन्सिल सारख्या संघटना ज्या भारतापासून वेगळे होण्याची मागणी करीत होत्या त्यांच्या विभाजनवादी विचारांना विरोध करीत जीवावर उदार होऊन अखंडतेसाठी त्यांनी जीवन समर्पित केले.



शिरीष चिटणीस

## ज्येष्ठ पत्रकार जयप्रकाश दगडे जैन भूषण पुरस्काराचे मानकरी

### जैन अल्पसंख्याक मंडळाचे अध्यक्ष ललित गांधी यांच्या हस्ते होणार गौरव, नांदेड येथे १६ फेब्रुवारी रोजी होणार सन्मान

**ज्योतिर्मय साहित्य**

**नांदेड** - नांदेड येथील सकल जैन समाजसेवा संघाच्या वतीने महाराष्ट्र राज्यातील जैन समाजाला भूषणावह असलेल्या कर्तृत्ववान व सर्वमान्य अशा व्यक्तींना राज्यस्तरीय पुरस्कार देऊन दि. १६ फेब्रुवारी रोजी गौरविण्यात येत आहे.

समस्त कासार समाजाला आनंदाची बातमी म्हणजे लातूर येथील ज्येष्ठ पत्रकार, माजी नगरसेवक, लेखक, मराठवाडा वैधानिक विकास महामंडळाचे लातूर जिल्हाध्यक्ष व कासार जोडो या चळवळीचे प्रणेते जयप्रकाश दगडे यांच्या आजपर्यंतच्या सामाजिक कार्याची दखल घेऊन त्यांना ‘‘जैन भूषण‘‘ ही उपाधी देऊन सन्मानित करण्यात येणार आहे.



जैन कासार समाजासाठी ही अत्यंत भूषणावह वार्ता असून दिगंबर जैन कासार समाज संस्था (भारत), जैन कासार प्रतिष्ठान, सोलापूर तसेच समस्त जैन कासार समाजातर्फे जयप्रकाश दगडे यांचे हार्दिक अभिनंदन... जयप्रकाश दगडे यांनी लातूर शहरातील एका चौकात जैन समाजाचा मानस्तंभ उभारण्यासाठी महानगरपालिकेकडे पाठपुरावा करून मान्यता मिळवून दिली असून जैन समाजाच्या अनेक उपक्रमात त्यांचा सक्रिय सहभाग असतो. दक्षिण भारत जैनसभेही त्यांना पुरस्कार देऊन गौरविले आहे. जैन साहित्य संमेलनातही त्यांचा सहभाग असतो. लातूर येथे कासार समाजाचे तत्कालीन मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांच्या उपस्थितीत ऐतिहासिक अधिवेशन त्यांनी घेतले होते. समस्त कासार समाजाने एकत्रितपणे आपल्या प्रश्नासाठी लढावे यासाठी कासार जोडो हे अभियानही त्यांनी राबविले. त्यांचा जैन भूषण उपाधीने होणारा गौरव कासार समाजाला भूषणावह आहे.

## कविसंमेलनातून केला मराठी मायबोलीचा जागर

### ज्येष्ठांसह नवोदितांचे कविसंमेलन रंगले; चौथे जनसंवाद ग्रामीण साहित्य संमेलन

**ज्योतिर्मय साहित्य**

नांदेड - मराठी भाषा संवर्धन पंधरवडा नुकताच साजरा झाला. मराठी भाषेला अलिकडेच अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त झाला आहे. मराठी भाषेचे महत्त्व टीकविण्यासाठी मराठी बोलणे आणि मराठीत व्यवहार करणं आवश्यक आहे. त्यामुळे आता राज्य सरकारने मराठी भाषेचं संवधर्न करण्यासाठी निर्णय घेतला आहे. आता महाराष्ट्राच्या सर्व शासकीय, निमशासकीय आणि महापालिका कार्यालयात मराठी बोलणे अनिवार्य करण्याचा निर्णय घेतला आहे. परंतु या आधीच साहित्य संमेलनातून ठराव घेऊन आणि कविसंमेलनाच्या माध्यमातून माय मराठी, मायबोलीचा जागर घडवून आणला. निमित्त होते चौथ्या जनसंवाद ग्रामीण साहित्य संमेलनाचे. समारोपापुर्वी झालेल्या कविसंमेलनाच्या सत्रात ज्येष्ठांसह नवोदितांनी मराठी मायबोलीचा जागर केला. या सत्राच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ कवी बी. जी. कळसे हे होते तर अतिथी कवी म्हणून अशोक कुबडे, सदानंद सपकाळे, निरंजन तपासकर यांची उपस्थिती होती. तसेच स्वागताध्यक्ष प्रविणदादा गायकवाड, निमंत्रक प्रल्हाद हिंगोले, सप्तरंगी साहित्य मंडळाचे संस्थापक अध्यक्ष अनुरत्न वाघमारे, राज्याध्यक्ष नागोराव डोंगरे, उपाध्यक्ष पांडुरंग कोकुलवार, कार्याध्यक्ष प्रज्ञाधर ढवळे, सचिव कैलास धुतराज, कोषाध्यक्ष शंकर गच्चे, महिला विभाग प्रमुख रुपाली वागरे वैद्य, जिल्हाध्यक्ष रणजित गोणारकर सचिव चंद्रकांत कदम, राहुल जोंधळे आदींची उपस्थिती होती.





येथील सप्तरंगी साहित्य मंडळ आणि प्रज्ञादर्शन शिक्षण संस्था मुदखेड यांच्या संयुक्त विद्यमाने मुदखेड येथे चौथे जनसंवाद ग्रामीण साहित्य संमेलन नुकतेच पार पडले. या संमेलनाच्या कविसंमेलन या सत्रात कवी बी. जी. कळसे यांच्या अध्यक्षतेखाली अशोक कुबडे, निरंजन तपासकर, सदानंद सपकाळे, प्रल्हाद हिंगोले, प्रज्ञाधर ढवळे, नागोराव डोंगरे, दत्ताहरी कदम, रुपाली वागरे, कैलास धुतराज, अनुरत्न वाघमारे, चंद्रकांत चव्हाण, राहुल जोंधळे, उषा ठाकूर, गोविंद कवळे, दत्ता वंजे, गणपत माखणे, गोविंद बामणे, धम्मोदय वाघमारे, सुमेध घुगरे, प्रकाश ढवळे, रामराव लक्ष्मण, रुपाली मोरे, दुर्गा पवार, शिरिष कुमार लोणकर, राजेश बडोले, ज्योती परांजपे, प्रतिभा पांडे, भारत सुर्यवंशी, सुभाष शिंगणकर, मारोती काळबांडे, जी. एस. भालेराव, डी. एन. मोरे, गौतम कांबळे, शुभम जाधव यांनी सहभाग नोंदविला. एकापेक्षा एक सरस आणि सुरस कवितांचे सादरीकरण करुन कविसंमेलनात रंगत भरली. कविसंमेलनाची सुरुवात अध्यक्ष कवी कळसे यांनी करुन दिली.

## पालक म्हणून मुलांना फक्त लढ म्हणा.....

**ज्योतिर्मय साहित्य**

नुकतेच दहावी, बारावी नीट,जेईई ॲडव्हान्स , सीईटी अशा अनेक इ.परीक्षांचे निकाल जाहीर झाले आहेत. मुलांनी घेतलेल्या मेहनतीनुसार त्यांच्या पदरात गुणांचे माप पडले आहे.भले ते कमी किंवा जास्त असेल. म्हणून खचायचे नाही किंवा हुरळूनही जायचे नाही. कारण प्रत्येक मुलाची बुद्धिमत्ता, आवड क्षमता, कुवत वेगवेगळी असते. त्यामुळे निराश न होता जो काही निकाल आला असेल तो स्वीकारुन पुढे जायचे.

आपल्या गुणांचा विचार करुन चांगला पर्याय निवडायचा. आणि उत्तम करिअर घडविण्यासाठी सज्ज व्हायचे.कमी गुण असतील तर मुलांना रागवण्यात अर्थ नाही. आता गरज आहे त्यांना धीर देण्याची. आत्मविश्वासाने पुन्हा पंखात बळ भरण्याची.हीच वेळ आहे पालक म्हणून त्याच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याची. आवश्यकता असेल तर त्याला आणखी एक संधी द्या स्वतःला सिद्ध करण्याची.

एका परीक्षेतील अपयशाने सगळं आयुष्य काही संपत नाही. म्हणून एका परीक्षेतील गुणांवर आपल्या पाल्याचे मोजमाप करु नका. कदाचित त्याला आता अपेक्षेप्रमाणे यश मिळविता आले नसेल म्हणून तो काहीच करु शकत नाही.त्याच्या पुढे सगळा अंधारच आहे. असे नव्हे. पुढे तो नक्कीच यशस्वी होऊ शकतो हा विश्वास त्याच्या मनात निर्माण करणं पालक म्हणून आज आपले काम आहे. कधीकधी प्रचंड कष्ट करुनही अपेक्षित यश हाताला लागत नाही म्हणून थांबायचे नसते तर नेटाने पुन्हा जायचे असते हा विश्वास देणं पालक म्हणून कर्तव्य आहे. आज शिक्षणक्षेत्रात प्रचंड अशी स्पर्धा आहे. मोठी चुरस आहे.मुले त्यात भरडली जात आहेत.मुलांना प्रचंड ताणतणावाला सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे अशा परीक्षेत मिळालेले यशही थोडेथोडके नसून आपल्या पाल्याच्या कष्टाचे फळ हणून आनंदाने त्याचा स्वीकार करा. करिअर निवडताना मुलांची आवड आणि कल पहा. त्यांच्या आवडीनुसार त्यांना करिअर निवडू द्या. आपल्या इच्छा त्यांच्यावर लादू नका. त्यांच्या आवडीच्या क्षेत्रात पुढे जाण्यासाठी त्यांना प्रोत्साहन द्या.



**विद्यार्थ्यांशी हितगुज**
**लक्ष्मण जगताप, बारामती**
संपर्क : ९४२३२ ४९९९६

जेणेकरुन त्याच्याकडून चांगली कामगिरी घडेल. उत्तम करिअर घडण्यासाठी तुम्ही त्याला प्रेरित करा.नक्कीच तो कसोटीवर उतरल्याशिवाय राहणार नाही. आज जगात वेगवेगळ्या क्षेत्रात खूप संधी आहेत.आपण स्वतःला कसे घडवितो हे सर्वात महत्त्वाचे आहे.संधीची वाट बघत बसू नका तर आपल्या बुद्धिमत्तेच्या आणि कष्टाच्या जोरावर संधी निर्माण करा.आणि त्या संधीचे सोने करुन स्वतःचे आयुष्य घडवा. आपल्यासाठी आधी महत्त्वाची मुले आहेत मग त्यानंतर परीक्षा आणि त्यांचे मार्क. त्यामुळे कमी मार्क म्हणजे सगळं संपले असेही नाही तर तुम्ही त्याला एक आव्हान समजा. त्या आव्हानाला समर्थपणे सामोरे जा. स्वतः ची वाट निवडून एक वेगळी ओळख निर्माण करा.ती तुम्हाला यशस्वी केल्याशिवाय राहणार नाही.





हे जनरल संपादक व प्रकाशक श्री.संजय व्यापारी यांनी १०१, सी विंग, सिल्व्हर स्पेस सोसायटी, विशाल नगर, पिंपळे निलख, पुणे-४११००१ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.
या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743918559